# मिरा भाईंदर महानगरपालिका
## परवाना विभाग
## || जाहीर आवाहन ||

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व व्यापारी वर्गास सुचित करण्यात येते की, दुकाने, कारखाने, उद्योगधंदे, इत्यादी वाणिज्य आस्थापनांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 313,376,383 अन्वये परवाना घेणे बंधनकारक असुन, विना परवाना व्यवसाय करणे कायदेशीर गुन्हा आहे, परवाना घेणेकरीता व्यापाऱ्यांनी पुढील हेल्पलाइन नंबर 8591146072 वर संपर्क करावे.

दुकाने, कारखाने, उद्योगधंदे इत्यादी व्यापारी आस्थापनांनी परवाने घेणेकामी, सर्वेक्षण करणे, नोटीसा वाटप करणे व नविन परवाने/नुतनीकरण परवाना वितरीत करणेकामी परवाना घेणेकरीता महानगरपालिका परवाना विभाग सर्व प्रभाग क्षेत्र कार्यालयात संपर्क करावे, तसेच महानगरपालिकेने मे.सेवादल नागरी सेवा.सहकारी संस्था या अधिकृत ठेकेदाराची नियुक्ती केली असुन, त्यांच्याकडील ओळखपत्र तपासुन परवाना घेणेबाबत व्यापाऱ्यांनी सहकार्य करावे.

महानगरपालिकेने वाणिज्य आस्थापनांना परवाना घेणे/नुतनीकरण करणेकरीता कमीत-कमी कागदपत्राच्या आधारे परवाना वितरीत करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी फक्त खालील कागदपत्रे देणे आवश्यक राहील.

1. विहीत नमुन्यातील अर्ज.
2. मालमत्ता कराचे बिल (चालु आर्थिक वर्षाचे) व कर भरणा पावती.
3. ओळखपत्र पुरावा (आधारकार्ड/पॅनकार्ड/मतदार/नोंदणी कार्ड).
4. खरेदीखत/भाडेकरारनामा/डिड.

| अ.क्र. | क्षेत्रफळ चौरस फुट | वार्षिक रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1) | 01 ते 250 | 500/- |
| 2) | 251 ते 500 | 1000/- |
| 3) | 501 ते 1000 | 2,000/- |
| 4) | 1001 ते 2500 | 4,000/- |
| 5) | 2501 ते 5000 | 6,000/- |
| 6) | 5001 ते 10000 | 8,000/- |
| 7) | 10001 पासुन पुढे... | 10,000/- |
| 8) | मोकळी जागा | 2,000/- |
| 9) | गॅरेज परवाना | 10,000/- |

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील सर्व वाणिज्य आस्थापनांनी (दुकाने, औद्यागिक गाळे इ.) तातडीने व्यवसाय परवाना/नुतनीकरण करुन घ्यावे व महानगरपालिकेला व शहर विकासाला सहकार्य करावे.

" विना परवाना व्यवसाय करणाऱ्या वाणिज्य आस्थापनावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 313,376,383 व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपविधी 2010 अन्वये कायदेशीर कारवाई करण्यांत येईल याची नोंद घ्यावी."

12/12/2023

(संजय शिंदे)
उपायुक्त (परवाना)
मिरा भाईंदर महानगरपालिका